# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१३ परीक्षेच्या उमेदवारांकरिता सूचना

राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१३ या परीक्षेकरिता ज्या उमेदवारांनी त्यांच्या प्रोफाईलमधील माहिती अद्ययावत केली आहे अशा तसेच दि. २६ एप्रिल, २०१३ च्या यादीतील उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे त्यांच्या प्रोफाईलवर देण्यात आली असून, ती त्यांनी तेथून प्रिंट करुन घ्यावीत. प्रवेशप्रमाणपत्र प्रिंट करण्यामध्ये अडचण असल्यास उमेदवारांनी दि. १३ मे, २०१३ पर्यंत आयोगाच्या ०२२-२२६७६४१०,२२१०२१५० या दूरध्वनी क्रमांकांवर तसेच sec.mpsc@gmail.com व sec.mpsc@maharashtra.gov.in या ईमेलवर संपर्क साधावा. उपरोक्त उमेदवारांनी दि. १३ मे, २०१३ पर्यंत संपर्क न साधल्यास त्यांना कोणतीही अडचण नाही असे गृहीत धरुन आयोगाकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

२. उमेदवारांना ज्या उपकेंद्रावर प्रवेश मान्य करण्यात आला आहे त्या व्यतिरिक्त ते अन्य केंद्रावर गेल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

**दि. ८ मे, २०१३** **सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**